लोकमत

# शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाने चर्चेसाठी यावे

## प्रशासन; 'सुटा'चे मंगळवारपासून आंदोलन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आणि कुलगुरु यांच्या कार्यपद्धतीबाबत शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) या संघटनेने तथ्यहीन आणि बदनामीकारक आरोप केले आहेत. या संदर्भात चर्चा करण्यासाठी विद्यापीठ प्रशासन सदैव तयार आहे. चर्चेसाठी या संघटनेने पुढे यावे, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी शुक्रवारी केले आहे.

दरम्यान, एका सहीच्या पदवी प्रमाणपत्र छपाईचा निर्णय कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांचा आहे. त्यांनी त्याबाबत प्रशासनाला तोंडी आदेश दिले. त्यांनी बेकायदेशीर, आर्थिक गैरव्यवहार केला असल्याचा आरोप 'सुटा'ने केला आहे. डॉ. शिंदे यांना कुलगुरु पदावरुन हटविण्याच्या मागणीसाठी मंगळवार (दि. १६) पासून आंदोलन सुरु केले जाणार असल्याची माहिती 'सुटा'चे जिल्हाध्यक्ष डॉ. अरुण पाटील, सहकार्यवाह सुभाष जाधव आणि सल्लागार सुधाकर मानकर यांनी गुरुवारी (दि. १०) येथे पत्रकार परिषदेत दिली. अरुण पाटील म्हणाले, प्रशासकीय गैरव्यवहारांबाबतच्या कारवाईस कुलगुरुंकडून दिरंगाई होत आहे. त्यांचे प्रमाद वाढत आहेत; त्यामुळे त्यांना पदावरुन हटविण्याच्या मागणीसाठी 'सुटा'ने पुन्हा आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. सुभाष जाधव म्हणाले, विद्यापीठाचे हित बाजूला ठेवून कुलगुरुंचे काम सुरु आहे. त्यांच्या कामकाजाविरोधातील आंदोलन टप्प्याटप्प्याने तीव्र केले जाईल.

सुधाकर मानकर म्हणाले, प्रमाणपत्र दुबार छपाई प्रकरणाबाबतच्या चौकशी समितीचा अहवाल चुकीचा आहे. या पत्रकार परिषदेस डी. एन. पाटील, आर. जी. कोरबू, प्रकाश कुंभार, आदी उपस्थित होते.

### चुकीचे आरोप, विद्यापीठाची बदनामी

दरम्यान, याबाबत कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, 'सुटा' संघटनेने जे आरोप केले आहेत, ते चुकीचे आणि खेदजनक आहेत. आरोपांबाबत चर्चा करण्यास विद्यापीठ प्रशासन तयार आहे. सर्व घटकांना बरोबर घेऊन विद्यापीठ प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. अशावेळी विद्यापीठाची बदनामी करण्याचे काम 'सुटा'कडून सुरु आहे. प्रमाणपत्र दुबार छपाई प्रकरणाबाबत विद्यापीठ प्रशासनाची कार्यवाही सुरु आहे.

लोकमत

## ए. जी. उंटावळे : वनस्पतीशास्त्र विभागातील राष्ट्रीय परिषद; 'मॅनग्रोव्हज अँड कोस्टल रिसोर्सेस'वर मार्गदर्शन

# पर्यावरण संवर्धनासाठी खारफुटीचे संरक्षण गरजेचे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** जागतिक पर्यावरणाच्या संवर्धनासाठी खारफुटीचे संरक्षण व संवर्धन ही अत्यावश्यक बाब आहे. तसे न झाल्यास मानवी अस्तित्वासाठी ते मारक ठरणार आहे, असे प्रतिपादन मॅनग्रोव्हज् सोसायटी ऑफ इंडियाचे कार्यकारी सचिव डॉ. ए. जी. उंटावळे यांनी शुक्रवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. निलांबरी सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे होते. 'मॅनग्रोव्हज अँड कोस्टल रिसोर्सेस' असा परिषदेचा विषय आहे.



शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागात आयोजित राष्ट्रीय परिषदेच्या स्मरणिकेचे प्रकाशन डॉ. ए. जी. उंटावळे आणि डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी डावीकडून व्ही. डी. जाधव, एन. एस. चव्हाण, डी. के. गायकवाड, एस. एस. कांबळे उपस्थित होते.

डॉ. उंटावळे म्हणाले, पर्यावरणाच्या दृष्टीने खारफुटीचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. केवळ सागरी जल पर्यावरणाबरोबरच इतर पर्यावरणाच्या दृष्टीनेही त्याचे मोठे महत्त्व आहे. निसर्गातील अतिरिक्त कार्बन शोषून घेण्याची अन्य वनस्पतींच्या तुलनेत खारफुटीची क्षमता अधिक असते. सागराला जमिनीवर अतिक्रमणापासून रोखणारी ती नैसर्गिक भिंत आहे. पायाभूत सुविधा निर्माणाच्या नावाखाली खारफुटीचा होत असलेला ऱ्हास अंतिमत: मानवी अस्तित्वाच्याच मुळावर येण्याची शक्यता आहे; त्यामुळे खारफुटीचे संरक्षण व संवर्धन यासाठी शासकीय, शैक्षणिक, संशोधकीय, सर्वसामान्य नागरिकांच्या स्तरांवरही प्रयत्न व जनजागृतीची गरज आहे. कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, खारफुटीच्या प्रश्नासंदर्भात शिवाजी विद्यापीठाने राष्ट्रीय स्तरावरही मोठे योगदान दिले आहे. विद्यापीठाच्या संशोधकांनी संशोधन, जनजागृतीसाठी काम केले आहे.

कार्यक्रमात परिषदेची स्मरणिका आणि 'मंगलवन' या विशेषांकाचे प्रकाशन प्रमुख उपस्थितांच्या हस्ते केले. यावेळी डॉ. एन. एस. चव्हाण यांना खारफुटीसंदर्भातील संशोधनाबद्दल 'फेलोशिप ऑफ मॅनग्रोव्हज सोसायटी ऑफ इंडिया' हा पुरस्कार देऊन गौरविले. यावेळी डॉ. एस. आर. यादव, जी. बी. दीक्षित, एन. बी. गायकवाड, आदी उपस्थित होते. अधिविभागप्रमुख डॉ. डी. के. गायकवाड यांनी स्वागत केले. डॉ. एस. एस. कांबळे यांनी आभार मानले.

# विद्यापीठ 'सुटा'बरोबर चर्चेस तयार

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाने (सुटा) कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या कार्यपद्धतीबाबत तथ्यहीन व बदनामीकारक आरोप केले आहेत. यासंदर्भात चर्चा करण्यासाठी विद्यापीठ प्रशासन सदैव तयार आहे. संघटनेने चर्चेसाठी पुढे यावे, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी पत्रकाद्वारे केले आहे.

पुढारी


# पर्यावरण संवर्धनासाठी खारफुटीचे संरक्षण आवश्यक

## डॉ. ए. जी. उंटवाले यांचे प्रतिपादन; वनस्पतीशास्त्र विभागात राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जागतिक पर्यावरणाच्या संवर्धनासाठी खारफुटीचे संरक्षण व संवर्धन अत्यावश्यक बनले आहे. तसे न झाल्यास मानवी अस्तित्वासाठी ते मारक ठरणार आहे, असे प्रतिपादन मॅनग्रोव्हज् सोसायटी ऑफ इंडियाचे कार्यकारी सचिव डॉ. ए. जी. उंटवाले यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ वनस्पतीशास्त्र अधिविभागातर्फे 'मॅनग्रोव्हज् अँड कोस्टल रिसोर्सेस' या विषयावर आयोजित राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. डॉ. उंटवाले यांनी व्याख्यानात खारफुटीच्या संदर्भातील अनेक तथ्यांचा वेध घेतला आणि तिचे महत्त्व स्पष्ट केले. ते म्हणाले, पर्यावरणाच्या दृष्टीने खारफुटीचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. सागराला जमिनीवर अतिक्रमणापासून रोखणारी ती नैसर्गिक भिंत आहे. पायाभूत सुविधा निर्माणाच्या नावाखाली खारफुटीचा होत असलेला ऱ्हास अंतिमतः मानवी अस्तित्वाच्याच मुळावर येण्याची शक्यता आहे. त्यामुळे खारफुटीचे संरक्षण व संवर्धन यासाठी शासकीय, शैक्षणिक, संशोधकीय व सामान्य नागरिकांच्या स्तरांवर प्रयत्न व जनजागृतीची गरज आहे.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित राष्ट्रीय परिषदेच्या स्मरणिकेचे प्रकाशन करताना डॉ. ए. जी. उंटवाले, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. व्ही. डी. जाधव, डॉ. एन. एस. चव्हाण, डॉ. डी. के. गायकवाड व डॉ. एस. एस. कांबळे. (छाया : नाज ट्रेनर)**

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, खारफुटीच्या प्रश्नासंदर्भात शिवाजी विद्यापीठाने केवळ महाराष्ट्राच्या नव्हे तर राष्ट्रीय स्तरावर मोठे योगदान दिले आहे. विद्यापीठाच्या संशोधकांनी संशोधन व जनजागृती यासाठी काम केले आहे. यावेळी परिषदेची स्मरणिका व 'मंगलवन' या विशेषांकाचे प्रकाशन झाले. यावेळी डॉ. एन. एस. चव्हाण यांना मॅनग्रोव्हज् सोसायटी ऑफ इंडियाचा जीवनगौरव पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. अधिविभागप्रमुख डॉ. डी. के. गायकवाड यांनी स्वागत केले. डॉ. एन. एस. चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एस. एस. कांबळे यांनी आभार मानले.

Kolhapur Edition
13 Apr, 2019 Page No. 3
Powered by : erelego.com

# सुटाने चर्चेसाठी यावे

## कुलसचिवांचे आवाहन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाकडून (सुटा) कुलगुरूंवर तथ्यहीन आरोप करण्यात येत आहेत. त्यामुळे विद्यापीठ प्रशासनाने एक पाऊल पुढे येत चर्चेची तयारी दाखवली असून यासाठी सुटानेही पुढे यावे, असे आवाहन विद्यापीठाच्या कुलसचिवांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे केले आहे. पत्रकानुसार, सुटाने ११ एप्रिल रोजी पत्रकार परिषद घेत कुलगुरूंच्या कार्यपद्धतीवर तथ्यहीन व बदनामीकारक आरोप केले आहेत. कुलगुरूंवरील आरोपांबाबत विद्यापीठ प्रशासन सदैव चर्चेसाठी तयार आहे. त्यामुळे सुटाने आता चर्चेसाठी पुढे यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 APR 2019
तरुण भारत

# विद्यापीठाचा दैनंदिन खर्च संकेतस्थळावर प्रकाशित करा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दैनंदिन खर्चाची माहिती तपशिलासह विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करावी, अशी मागणी भ्रष्टाचारविरोधी जनआक्रोश संघटनेच्या वतीने कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे करण्यात आहे. जिल्ह्यातील प्रशासकीय कार्यालयाचा दैनंदिन खर्चाचा तपशिल संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात यावा, या मागणीसाठी जनआक्रोशतर्फे पत्रव्यवहार, धरणे व इतर मार्गांनी आंदोलन सुरू आहे. जिल्हाधिकाऱ्यांनीही या संदर्भात तपशिल प्रकाशित करण्याचे आदेश दिले आहेत. त्याची अंमलबजावणी व्हावी, अशी अपेक्षाही जनआक्रोशच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे. निवेदन देताना जिल्हाध्यक्ष उत्तम पोवार, शुभम शिरहट्टी, संतोष राठोड, पप्पू बल्लाळ, सविता रायकर, सुनीता कांभरे आदी उपस्थित होते.

03 APR 2019

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पर्यावरणासाठी खारफुटीचे संवर्धन आवश्यक

## डॉ. ए. जी. उंटवाले यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात खारफुटी व सागरी संपदेवर राष्ट्रीय परिषद

प्रतिनिधी
कोल्हापूर

जागतिक पर्यावरणाच्या संवर्धनासाठी खारफुटीचे संरक्षण व संवर्धन अत्यावश्यक बाब आहे. तसे न झाल्यास मानवी अस्तित्वासाठी ते मारक ठरणार आहे, असे प्रतिपादन मॅनग्रोव्हज सोसायटी ऑफ इंडियाचे कार्यकारी सचिव डॉ. ए.जी. उंटवाले यांनी शुक्रवारी केले. शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागातर्फे "खारफुटी व सागरी संपदा" या विषयावर आयोजित राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. नीलांबरी सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे होते.

डॉ. उंटवाले यांनी आपल्या व्याख्यानात खारफुटीच्या संदर्भातील अनेक तथ्यांचा वेध घेतला आणि तिचे महत्त्व स्पष्ट केले. ते म्हणाले, पर्यावरणाच्या दृष्टीने खारफुटीचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. निसर्गातील अतिरिक्त कार्बन शोषून घेण्याची अन्य वनस्पतींच्या तुलनेत खारफुटीची क्षमता अधिक असते. त्याचप्रमाणे सागराला जमिनीवर अतिक्रमणापासून रोखणारी ती नैसर्गिक भिंत आहे. पायाभूत सुविधा निर्माणाच्या नावाखाली खारफुटीचा होत असलेला ऱ्हास अंतिमतः मानवी अस्तित्वाच्याच मुळावर येण्याची शक्यता आहे. त्यामुळे खारफुटीचे संरक्षण व संवर्धन यासाठी शासकीय, शैक्षणिक, संशोधकीय तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या स्तरांवरही प्रयत्न व जनजागृतीची गरज आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, खारफुटीच्या संवर्धनासाठी मॅनग्रोव्हज सोसायटी ऑफ इंडियाच्या सहकार्याने शिवाजी विद्यापीठ सक्रिय योगदान देण्यासाठी सदैव तत्पर आहे. दरम्यान, परिषदेची स्मरणिका व 'संग्रहन' या विशेषांकाचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. एन.एस. चव्हाण यांना "मॅनग्रोव्हज सोसायटी ऑफ इंडिया"चा जीवनगौरव पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल कुलगुरु डॉ. शिंदे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. अधिविभाग प्रमुख डॉ. डी. के. गायकवाड यांनी स्वागत, डॉ. एन.एस. चव्हाण यांनी प्रास्ताविक केले, तर डॉ. एस.एस. कांबळे यांनी आभार मानले.



कोल्हापूर : राष्ट्रीय परिषदेच्या स्मरणिकेचे प्रकाशन करताना डॉ. ए. जी. उंटवाले, कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे. सोबत डावीकडून डॉ. श्रीमती जाधव, डॉ. श्रीमती चव्हाण, डॉ. डी. के. गायकवाड व डॉ. एस. एस. कांबळे.